## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1468 नाग/2010

श्री प्रल्हाद बाबुराव समर्थ
9, न्यु शिवाजी नगर(जुने काशीनगर क्र.2)
अभय नगर रोड(पश्चिम) रामेश्वरी रिंग रोड
नागपूर ता. जि. नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. बी. जयस्वाल
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विद्युत)
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री सतिष भगाडे
जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता(विद्युत)
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता(विद्युत) महानगर पालिका नागपूर यांचेकडे पथदीप लावण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.8.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या नंतर देखील माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 28.4.2010 च्या माहिती अधिकारा खाली अर्जाप्रमाणे त्यांच्या घराजवळ पथदीप लावण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. सदरच्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांनी योग्य रकमेचा पोस्टल स्टॅम्प

लावलेला लिफाफा मागितलेला होता. तसेच रु. 2/– माहितीची फी भरण्यासाठी दि. 24.5.2010 च्या पत्राने त्यांना कळविले होते. मात्र अपीलकर्ता यांनी असे सांगितले की माहितीची फी आणि पोस्टाचा खर्च त्यांना देण्याची आवश्यकता कायद्याप्रमाणे नाही. म्हणून त्यांनी माहितीची फी आणि पोस्टाचा स्टॅम्प लावलेला लिफाफा माहिती अधिकारी यांचेकडे पाठविलेला नाही. त्यानंतरही अपीलकर्ता यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता(विद्युत) महानगर पालिका नागपूर यांचेकडे दाखल केल्यानंतर त्यांचे अपील फेटाळले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता(विद्युत) महानगर पालिका नागपूर यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्यास दि. 24.5.2010 च्या पत्रान्वये त्यांनी मागितलेली माहिती विद्युत विभागात उपलब्ध असून त्या माहितीची फी रु. 2/– पोस्टाचा स्टॅम्प लावलेला लिफाफा माहिती अधिकारी यांचेकडे जमा करण्यास दि. 24.5.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविले. मात्र अपीलकर्त्याने माहितीची फी आणि पोस्टाचा स्टॅम्प लावलेला लिफाफा त्यांचेकडे जमा केला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती पुरविला आली नाही.

5. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे प्रथम अपील दि. 3.8.2010 रोजी दाखल झाले होते. त्याची सुनावणी दि. 9.8.2010 रोजी ठेवण्यात आली होती. तथापी सदरच्या सुनावणीस हजर राहण्याची आवश्यकता नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीच्या पत्रावर लिहून दिले म्हणून सुनावणीस अपीलकर्ता हजर झाले नाहीत. तसेच माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास डाक खर्चाचा लिफाफा आणि माहितीची फी रु. 2/– भरले नाहीत व डाक खर्चाचा लिफाफा माहिती अधिकारी यांचेकडे दिला नाही म्हणून प्रथम अपील दि. 16.8.2010 रोजी निर्णय देवून फेटाळलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास दि. 20.8.2010 रोजी पोस्टाने पाठविल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दि. 28.4.2010 च्या अर्जानुसार पाहिजे असलेली माहितीची फी रु. 2/– आणि योग्य रकमेचा पोस्टाचा स्टॅम्प लावलेला लिफाफा सादर करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 24.5.2010 रोजी अपीलकर्त्यास कळविले होते. तथापी अपीलकर्त्याने माहितीची फी रु. 2/– भरणा केला नाही तसेच योग्य रकमेचा पोस्टाचा स्टॅम्प लावलेला लिफाफा सादर केला नाही. वास्तविक पाहता अपीलकर्त्याने माहितीची फी आणि डाक खर्च इत्यादी खर्च भरणे माहिती अधिकाराखाली आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याने माहितीची फी भरुन टपालाऐवजी स्वतः माहिती कार्यालयात जावून व्यक्तीशः उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल आणि सदरची माहिती व्यक्तीशः कार्यालयात जावून घेण्याबाबत अपीलकर्ता यांनी संमती दिली. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत अपीलकर्ता यांनी उपस्थित राहून माहितीची योग्य ती फी भरुन जन माहिती अधिकारी यांचेकडून व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी फी भरल्यानंतर अपीलकर्त्यास व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1158-1160

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1470 नाग/2010**

श्री प्रल्हाद बाबुराव समर्थ
9, न्यु शिवाजी नगर(जुने काशीनगर क्र.2)
अभयनगर रोड(पश्चिम) रामेश्वरी रिंग रोड
नागपूर ता. जि. नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री या. व्ही. कुंभारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती का. प्र. नाखले
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.12.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हा नियोजन समिती नागपूर यांचेकडे न्यु शिवाजी नगर गली नं. 1 च्या बाबत डांबरीकरणाची माहिती मागितलेली दिसून येते. त्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.6.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 1.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा नियोजन समिती नागपूर यांचेकडे न्यु शिवाजी नगर गली नं. 1 मधील झालेल्या डांबरीकरणाची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना माहिती अधिकारी यांनी दि. 9.6.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र त्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील खारीज करण्यात आले. तथापी त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की न्यु शिवाजी नगर गली नं. 1 मधील झालेल्या खडीकरणाची माहिती दि. 9.6.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की आमदार स्थानीक विकास कार्यक्रम सन 2008–2009 अंतर्गत नागपूर दक्षिण मतदार संघ क्षेत्रामध्ये काशीनगर येथे श्री समर्थ ते श्री काटोले यांच्या घरापर्यंत रस्ता खडीकरण केलेला असून त्या कामाकरीता रु. 4,74,720/– मान्यता दिलेली आहे.

आणि सदरचा निधी मा. आमदार श्री दिनानाथ पडोळे दक्षिण नागपूर यांच्या आमदार स्थानीक विकास कार्यक्रमातून निधी उपलब्ध करुन घेण्यात आलेला आहे. म्हणजे त्या रस्त्याचे डांबरीकरण झालेले नसून खडीकरण झालेले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे यांनी नमूद केले की अपीलकर्ता यांचा प्रथम अपील अर्ज त्यांचेकडे दि. 11.8.2010 रोजी दाखल झाला. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 6.9.2010 रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर होते. तथापी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.6.2010 च्या पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपील फेटाळण्यात आलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्त्याचे दि. 1.6.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 9.6.2010 रोजीच्या पत्राने आवश्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाले असल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत कबूल केले. तथापी सदरच्या रस्त्याचे डांबरीकरणा ऐवजी खडीकरण झालेले आहे अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमूद केले. त्याबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. म्हणून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.6.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1161-1162

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1469 नाग/2010**

श्री प्रल्हाद बाबुराव समर्थ
9, न्यु शिवाजी नगर(जुने काशीनगर क्र.2)
अभयनगर रोड(पश्चिम) रामेश्वरी रिंग रोड
नागपूर ता. जि. नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जी. डी. जांभूळकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक(स्लम)
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री ए. बी. कडू
जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता
धंतोली झोन क्र. 4, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी धंतोली झोन क्र. 4, महानगर पालिका नागपूर यांचेकडे श्री समर्थ यांच्या घरापासून ते काटोले यांच्या घरापर्यंत रोडच्या डांबरीकरणाबाबत 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.6.2010 रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी नागपूर महानगर पालिका यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तथापी प्रथम अपील फटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 1.6.2010 च्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकारी धंतोली झोन क्र. 4, महानगर पालिका नागपूर यांचेकडे श्री समर्थ यांच्या घरापासून ते काटोले यांच्या घरापर्यंत रोडच्या डांबरीकरणाबाबत 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन माहिती अधिकारी यांनी दि. 22.6.2010 रोजी सर्व मुद्यांची माहिती पाठविलेली आहे. मात्र त्या माहितीमुळे अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 1.6.2010 च्या अर्जाप्रमाणे माहितीच्या अर्जाला अनुसरुन 1 ते 10 मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की

नागपूर महानगर पालिकेतर्फे अपीलकर्ता यांनी विचारलेल्या रोड बाबत डांबरीकरणाची कामे सुरु नाही किंवा केलेले नाही अशी माहिती अपीलकर्त्यास पुरविलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरच्या रस्त्याचे डांबरीकरण झालेले दिसून येते. याबाबत सदरचे डांबरीकरणाचे काम स्थानीक रहिवाशांनी स्वखर्चाने केलेले आहे अशी माहिती सुनावणीस उपस्थित असलेल्या जिल्हा नियोजन अधिकारी यांनी दिली आणि त्याबाबतची नागरीकांच्या सहीचे पत्र त्यांनी सुनावणीत दाखल केले. सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास आयोगासमोर पुरविण्यात आली. त्यामुळे सदरच्या डांबरीकरणाचे काम स्थानीक रहिवाशांनी स्वखर्चाने केल्याचे दिसून येते. आणि याबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले.

5. एकंदीरत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.6.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे आणि डांबरीकरणाचे काम हे स्थानीक रहिवाशांनी स्वखर्चाने केल्याबाबतचे पत्र अपीलकर्त्यास पुरविण्यात आल्यामुळे अपीलकत्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1165-1166

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1364 नाग/2010

श्री बाळकृष्ण रुपचंद खेडीकर
ग्रामसेवक कॉलनी, संत कबीर वार्ड, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) कॅप्टन श्री राजेंद्र पी. सनेर–पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(क.व औ.सं.)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन,
डॉ. नायर मार्ग, मुंबई सेंट्रल
मुंबई – 400008
2) जन माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग अधिकारी(से.मं.)
सेवा मंडळ शाखा, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन,
डॉ. नायर मार्ग, मुंबई सेंट्रल
मुंबई – 400008 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 14.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे दि. 2.12.2010 रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्या दिवशी अपीलकर्त्याने त्यांचे म्हणणे मांडले. मात्र उत्तरवादी यांनी पुढील सुनावणीची तारीख मागितली. त्याला अनुसरुन पुढील सुनावणी आज दि. 8.12.2010 रोजी घेण्यात आली.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी महाव्यवस्थापक यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांचेकडे माहिती अधिकारा खाली अर्ज करुन श्री डाबर्से यांच्यावर केलेली कार्यवाही आणि इतर मुद्ये अशा प्रकारे एकुण 3 मुद्यांखाली अ,ब असे पोट विभाग पाडून माहिती मागितलेली दिसून येते. विहित

मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील महाव्यवस्थापक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 2.12.2010 रोजी त्यांची बाजू मांडली. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांनी दि. 19.4.2010 रोजी माहिती अधिकारा खाली अर्ज देवून माहिती मागितलेली होती. मात्र सदरची माहिती त्यांना प्रथम अपील दाखल केल्यानंतरही प्राप्त झालेली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे त्यांनी दि. 2.12.2010 च्या सुनावणीत नमुद केले.

4. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अर्जावर दि. 28.5.2010 रोजी कार्यवाही करुन त्यांना असे कळविले आहे की माहिती अधिकारा अंतर्गत मागणी केलेली माहिती अत्यंत त्रोटक व संदिग्ध स्वरुपाची असल्यामुळे त्यांचे म्हणणे मुद्येसुद स्पष्टपणे मांडून त्यानुसार अर्ज केल्यास त्यावर कारवाई करणे शक्य होईल. म्हणून अपीलार्थीने केलेल्या अर्जात निश्चित स्वरुपात त्यांना हवी असलेल्या माहितीचा उल्लेख नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.5.2010 च्या पत्राने कळविलेले आहे.

5. आज दि. 8.12.2010 रोजी सुनावणीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई हे उपस्थित झाले. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 19.4.2010 चा माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या माहितीच्या व्याख्येत बसत नसल्याचे दिसून येते. तसेच मागितलेली माहिती अत्यंत त्रोटक, संदिग्ध व प्रश्नार्थक स्वरुपाची आहे म्हणून अपीलकर्ता यांना दि. 28.5.2010 च्या पत्राने कळविलेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असेही सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज हा त्रोटक, संदिग्ध व प्रश्नार्थक स्वरुपाचा असल्यामुळे तो माहिती अधिकाराच्या व्याख्येत बसत नाही या कारणास्तव त्यांचे प्रथम अपील देखील त्यांनी फेटाळलेले आहे.

6. अपीलकर्ता यांनी दि. 2.12.2010 रोजी त्यांचे म्हणणे मांडले होते तसेच आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांचा लेखी खुलासा अवलोकन करण्यात आला. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेण्यात आले. त्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांचा दि. 19.4.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज हा त्रोटक व संदिग्ध स्वरुपा दिसून येतो. अशी वस्तुस्थिती जरी असली तरी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असेल ती त्यांना पुरविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्याकडील दि. 19.4.2010 च्या अर्जातील माहिती ज्या स्वरुपात कार्यालयात उपलब्ध असेल त्या स्वरुपात अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1167-1169

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1488 नाग/2010**

श्री श्रीकांत रामचंद्र बोरकर
महासचिव–पीपल्स डेमॉक्रेटिक मुव्हमेंट,नागपूर शहर
बारसे नगर पाचपावली डॉ.आबेडकर मार्ग
नागपूर 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जनरोडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी
दक्षता पथक(नागपूर परिमंडळ)
जलसंपदा विभाग, 2रा माळा, प्रशासकीय इमारत क्र.1,
सिव्हील लाईन्स, नागपूर 440001
2) श्री विजय धापोडकर
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
दक्षता पथक(नागपूर परिमंडळ)
जलसंपदा विभाग, 2रा माळा, प्रशासकीय इमारत क्र.1,
सिव्हील लाईन्स, नागपूर 440001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.12.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता दक्षता पथक(नागपूर परिमंडळ) जलसंपदा विभाग, सिव्हील लाईन्स, नागपूर यांचेकडे माहिती अधिकारा खाली बिंदू नामावली व आस्थापना विषयक बाबी संदर्भात 1 ते 4 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 318..2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 29.7.2010 रोजी जन माहिति अधिकारी यांचेकडे बिंदू नामावली व आस्थापना विषयक इतर बाबी तसेच श्री अशोक शंकरराव मेंढे यांच्या पदोन्नती व स्वेच्छोनिवृत्ती संबंधात माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी दक्षता पथक(नागपूर परिमंडळ) जलसंपदा विभाग नागपूर यांचेकडे दि. 31.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 16.9.2010 रोजी घेण्यात आली. त्या दिवशी प्रकृतीच्या अस्वास्थामुळे अपीलकर्ता सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 29.7.2010 रोजी त्यांचेकडे प्राप्त झाल्यानुसार माहिती काढण्यात आली आणि त्या माहितीचे 11 पानाचे 22 रु. शुल्क 25 रु. डाक खर्च असे एकुण 47 रु. चालानद्वारे भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 25.8.2010 च्या पत्रान्वये लेखी कळविले. मात्र सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही म्हणून अपीलकर्त्याने फी चा भरणा केला नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 25.8.2010 चे रु. 47/– शुल्क भरण्या बाबतचे पत्र यु.पी.सी.ने पाठविले नाही मात्र साध्या पोस्टाने पाठविलेले असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. तथापी शुल्क भरण्या बाबतचे पत्र साध्या पोस्टाने पाठविल्या बाबत जावक रजिस्टर किंवा इतर कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी हे सुनावणीत दाखवू शकले नाहीत.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दि. 31.8.2010 रोजी दाखल झाले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 16.9.2010 रोजी घेण्यात आली. परंतू सदरच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर होते. म्हणून अपीलकर्ता यांचे म्हणणे एकुन घेता आले नाही. तथापी त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.11.2010 रोजी देवून त्यात असे नमूद केले की अपीलकर्त्याने शुल्क व डाक खर्च रु. 47/– चा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करावा म्हणजे माहिती उपलब्ध करुन घेता येईल असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 25.8.2010 रोजी माहितीची फी रु. 22/– व डाक खर्च रु. 25/– असे एकुण रु. 47/– शुल्क भरण्या बाबत दि. 25.8.2010 चे पत्र साध्या पोस्टाने पाठविल्याबाबत कोणताही पुरावा सुनावणीत जन माहिती अधिकारी हे दाखवू शकले

नाहीत. आणि अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना रु. 47/— शुल्क भरण्याचे दि. 25.8.2010 चे पत्र अद्यापही मिळालेले नाहीत. म्हणून अपीलकर्त्यास सदरची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली 1 ते 4 मुद्यांची मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1170-1172

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1487 नाग/2010**

श्री रमेशकुमार मनोहरलाल बाली
क्यू/235, फुटाना ओली, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य
सेठ रामनाथ लोईया कॉलेज, कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री आर. एम. डुमरे
जन माहिती अधिकारी
सेठ रामनाथ लोईया कॉलेज, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.12.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी सेठ रामनाथ लोईया कॉलेज, कामठी ता. कामठी जि. नागपूर यांचेकडे सन 2007–08, 2008–09 आणि 2009–10 या वर्षामध्ये 11 वीत जे प्रवेश दिले आहे त्या प्रवेशा बाबतची टक्केवारीची माहिती मागितलेली दिसून येते. तसेच कु. दिक्षा मेंढे यांना 11वीत का प्रवेश दिला नाही त्याची देखील माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.9.2010 रोजी प्रथम अपील प्राचार्य यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की दि. 29.7.2010 रोजी त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सन 2007–08, 2008–09 आणि 2009–10 या वर्षामध्ये 11 वीत प्रवेश दिले आहे त्या प्रवेशा बाबतची टक्केवारीची माहिती आणि कु. दिक्षा मेंढे यांना 11वीत का प्रवेश न मिळाल्याबाबतची कारणे इत्यादीची माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही तसेच प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी हे सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या कडील दि. 10.12.2010 च्या पत्रान्वये आयोगापुढे असे लेखी दिलेले आहे की अपीलकर्ता यांचा माहिती अधिकारा खालील कोणताही अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की सदरचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पोस्टाने किंवा

हस्तदेय अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. त्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न उदभवलेला नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे नमूद केले की त्यांनी दि. 29.7.2010 चा माहितीचा अर्ज पोस्टाने पाठविलेला होता. मात्र रजिस्टर पोस्टाने किंवा हस्तदेय पाठविलेला नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमूद केले. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असेही नमूद केले की अपीलकर्ता हा त्यांच्या कार्यालयात स्वतः अर्ज घेवून आले असते तर त्यांना त्याचवेळी माहिती उपलब्ध करुन देता आली असती. मात्र अपीलकर्ता हे कार्यालयात कधीही आले नाहीत म्हणून जन माहिती अधिकारी आणि अपीलकर्ता यांच्या संमतीने आयोगासमोर असे ठरविण्यात आले की जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. 29.7.2010 चा अपीलकत्याचा माहितीचा अर्ज सुनावणीच्या वेळी देण्यात आला आणि जन माहिती अधिकारी यांनी माहितीची आवश्यक ती फी घेवून अपीलकर्त्यास 15 दिवसात माहिती पुरविण्यासाठी संमती दिली. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना यांच्याकडील दि. 29.7.2010 च्या माहितीच्या अधिकारा खालील दिलेल्या अर्जातील माहिती नियमाप्रमाणे शुल्क आकारुन उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1173-1174

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1493 नाग / 2010

श्री गजानन शेषराव कारेमोरे
मु. पो. वहानगाव
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 14.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वरोरा यांचेकडे पोलीस पाटील वहानगाव ता. चिमूर यांचे विरुध्द गावक–यांनी केलेल्या तकारीच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबाबतची माहिती माहितीच्या अधिकारा खाली उपलब्ध करुन देण्याची विनंती केलेली होती. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची दि. 31.8.2010 रोजी सुनावणी घेण्यात येवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाल्यामुळे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की पोलीस पाटील वहानगाव ता. चिमूर यांचे विरुध्द गावक–यांनी तकार केलेली होती. सदरच्या तकारीत पोलीस पाटील पदाचा गैरवापर तसेच गावातील शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणे इत्यादी स्वरुपाच्या तकारी गावक–यांनी केलेल्या होत्या. सदरच्या तकारी सन 2006 ते 2010 या कालावधीत केलेल्या होत्या. मात्र वेळेत या तकारीतर कार्यवाही झालेली नाही. तसेच सुनावणीत अपीलकर्ता यांनी असेही सांगितले की त्यांना दि.

26.8.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत पोलीस पाटील यांना निलंबित केलेले आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र त्या माहितीमुळे त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अति. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्याची केवळ समजूत काढण्यात आली असे दिसते. मात्र त्यामुळे देखील त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्या वतीने त्यांच्या कार्यालयातील नायब तहसिलदार हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा दि. 16.6.2010 चा माहिती अधिकारा खालील अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 16.6.2010 रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन त्याची चौकशी करण्यासाठी तहसिलदार चिमूर यांचा चौकशी अहवाल दि. 23.6.2010 च्या पत्राने मागितला आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिली. त्यानंतर तहसिलदार चिमूर यांनी दि. 16.8.2010 च्या पत्राने चौकशी अहवाल पाठविला. तो चौकशी अहवाल जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 21.8.2010 रोजी प्राप्त झाला. त्या अहवालाच्या आधारे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी संबंधित पोलीस पाटीला विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात आल्याबाबत कळविले. तहसिलदार चिमूर यांचेकडून प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाच्या आधारे पोलीस पाटील वहानगाव यांना नियमाप्रमाणे कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आणि त्यानंतर दि. 22.10.2010 च्या आदेशाने पोलीस पाटील यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली. निलंबनाच्या कार्यवाहीची माहिती देखील अपीलकत्यास दि. 22.10.2010 च्या पत्राने पाठविली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 25.10.2010 रोजी मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

5. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री खंडाळे नायब तहसिलदार हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दि. 9.8.2010 रोजी दाखल झाले. त्या अपीलाची सुनावणी दि. 7.8.2010 आणि दि. 31.8.2010 रोजी घेण्यात आली. आणि सदरच्या कार्यालयात अपीलकर्त्यास झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यात येवून त्यांची समजूत काढण्यात आली आणि त्याबाबत त्यांचे समाधान झाले म्हणून प्रथम अपील खारीज करण्यात आले.

6. अपीलकर्ता आणि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. 23.6.2010 च्या पत्राने आणि दि. 22.10.2010 च्या पत्राने पोलीस पाटीला विरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती दिलेली दिसून येते. त्यावरुन दि. 22.10.2010 च्या पत्राने संबंधित पोलीस पाटील यांना उपविभागीय अधिकारी यांनी निलंबित केलेले असून त्याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1175-1177

जा.क्र.—————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1495 नाग/2010**

सौ. रिचा सुनिल खत्री
मु. पो. मुल
ता. मुल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती संघमित्रा ढोके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद मुल
ता. मुल जि. चंद्रपूर
2) श्रीमती शकुंतला समर्थ
जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय मुल
ता. मुल जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.12.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 15.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय मुल यांचेकडे माहिती अधिकारा खाली महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय दि. 10.2.2001, 18 मे 2001 व 10 सप्टेंबर 2001 या तीन शासन निर्णयाच्या प्रती आणि सर्व्हे नं. 4 आणि सर्व्हे नं.7 मध्ये गुंठेवारी करतांना सादर करण्यात आलेल्या कागदपत्राच्या प्रती इत्यादीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 25.8. 2010 रोजी शासन निर्णयाच्या तिन्ही प्रती आणि सर्व्हे नं. 4 आणि सर्व्हे नं.7 मध्ये गुंठेवारीची कागदपत्रे अशी एकुण 176 पानांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. मात्र मिळालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी मुख्याधिकारी नगर परिषद मुल यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी माहिती अधिकारा खालील दि. 13.8.2010 रोजी माहिती मागण्याचा अर्ज जन माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय मुल यांचेकडे केला होता. त्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्त्यास दि. 25. 8.2010 रोजीच्या पत्राने तीन शासन निर्णयाच्या प्रती त्यांनी मागितल्या प्रमाणे मिळाल्या. तसेच सर्व्हे नं. 4 आणि सर्व्हे नं.7 मधील गुंठेवारीची काही कागदपत्रे त्यांना प्राप्त झाली मात्र सर्व्हे नं.7 मधील

प्लॉट नं. 13 चे श्री बरडे यांनी केलेल्या गुंठेवारीची कागदपत्रे त्यांना अद्यापही मिळालेले नाहीत. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील श्री बरडे यांच्या प्लॉट नं. 13 चे कागदपत्रे त्यांना मिळालेले नाहीत असे त्यांनी सुनावणीत नमूद केले. सदरची कागदपत्रे त्यांना न्यायालयाच्या कामकाजासाठी आवश्यक असल्याचे प्रतीपादन त्यांनी आजच्या सुनावणीत केले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दि. 13.8.2010 चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर सदरच्या अर्जाची माहिती ही नगर परिषदेच्या बांधकाम विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडून माहिती प्राप्त केली. ती माहिती प्राप्त झाल्यानंतर दि. 25.8.2010 रोजी पत्राने अपीलकर्त्यास सुमाने 176 पानाची माहिती पुरविण्यात आली. त्या मध्ये शासनाचे तीन्ही जी. आर. च्या प्रती आणि सर्व्हे नं. 4 आणि सर्व्हे नं.7 मधील उपलब्ध असलेल्या गुंठेवारीची कागदपत्रे अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सर्व्हे नं.7 मधील प्लॉट नं. 13 चे गुंठेवारीचे कागदपत्र श्री बरडे यांचे त्यांना पाहिजे आहेत. ते कागदपत्र त्यांना मिळाले नाहीत. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की कार्यालयामध्ये सर्व्हे नं.7 मधील प्लॉट नं. 13 चे गुंठेवारीचे कागदपत्र श्री निबेंकर यांचे उपलब्ध होते ते अपीलकर्त्यास पुरविण्यात आले. मात्र श्री बरडे यांचे प्लॉट नं. 13 चे गुंठेवारीचे कागदपत्र त्यांचे कार्यालयात दिसून येत नाही. त्यामुळे श्री बरडे यांचे कागदपत्र अपीलकर्त्यास देता आले नाहीत. याबाबत आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे सहाय्यक माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की बांधकाम विभागाच्या कार्यालयाचे नुतनीकरण करण्यात येत असल्यामुळे सदरची कागदपत्र स्थलांतर करण्यात आलेली आहेत. त्यामुळे ती कागदपत्र त्यांना मिळालेली नाहीत.

5. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी देखील असे सांगितले की अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांचेकडे दि. 30.8.2010 रोजी प्राप्त झाला. त्यावर सुनावणी दि. 23.9.2010 रोजी घेण्यात आली आणि सुनावणी दरम्यान अपीलकर्ता यांनी सर्व्हे नं.7 मधील प्लॉट नं. 13 चे श्री बरडे यांनी केलेल्या गुंठेवारीचे कागदपत्राच्या प्रती त्यांना न्यायालयीन कामकाजाकरीता पाहिजे असल्याचे नमुद केले. अपीलकर्त्याचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी आणि सहाय्यक माहिती अधिकारी यांना सदरची कागदपत्रे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे सुनावणीत सांगितले. तथापी अद्यापही अपीलकत्यास श्री बरडे यांच्या गुंठेवारीचे कागदपत्र जन माहिती अधिकारी आणि सहाय्यक माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध झाले नाहीत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांना त्यांनी मागणी केलेल्या माहिती अधिकारा खालील अर्जाप्रमाणे शासन निर्णयाच्या तिन्ही प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसतात. मात्र सर्व्हे नं.7 मधील प्लॉट नं. 13 चे श्री बरडे यांचे गुंठेवारीचे कागदपत्र त्यांना उपलब्ध झालेली नाहीत. वास्तविक पाहता नगर परिषदेकडून श्री बरडे यांच्या प्लॉट नं. 13 चे आदेश झालेले आहेत. म्हणून सदरचे कागदपत्र नगर परिषदेच्या कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. केवळ कार्यालयाचे नुतनीकरण करण्यात येत आहे तसेच कार्यालयातील कागदपत्र स्थलांतर झालेले आहेत म्हणून ती कागदपत्र उपलब्ध होत नाहीत हे जुजबी करण देणे योग्य व संयुक्तिक नाही. म्हणून श्री बरडे यांच्या प्लॉट नं. 13 चे गुंठेवारीच्या कागदपत्रांचा पुन्हा शोध घेवून ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व ती 15 दिवसात अपीलकर्त्यास पुरवावी. तथापी शोध घेवूनही ती उपलब्ध न झाल्यास ज्या कर्मचा–याच्या ताब्यात सदरची कागदपत्रे आहेत त्यांच्यावर कागदपत्र गहाळ केल्याप्रकरणी मुख्याधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा एकदा कागदपत्रांचा कसून शोध घ्यावा. आणि अपीलकर्त्यास वरील कागदपत्र विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावे.

2) वर नमुद केलेल्या कागदपत्रांचा शोध घेवून ती कागदपत्र उपलब्ध न झाल्यास ज्या कर्मचा–याच्या ताब्यात सदरची कागदपत्रे आहेत त्यांच्या विरुध्द मुख्याधिकारी यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1179-1181

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1500 नाग/2010

श्री धनपाल पंढरी मेश्राम
मु. पो. नान्होरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. उपविभाग ब्रम्हपूरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर
2) श्री महेंद्र कुत्तरमारे
जन माहिती अधिकारी सहाय्यक अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. उपविभाग ब्रम्हपूरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. उपविभाग ब्रम्हपूरी यांचेकडे 1 जानेवारी 2009 ते 15 मे 2010 पर्यंत नविन विद्युत कनेक्शन करीता आलेल्या अर्जाबाबतची माहिती. त्यापैकी जोडणी करीता मंजूर केलेले अर्ज, मंजूर झालेल्या डिमांड नोट इत्यादी प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 7.7.2010 रोजी माहिती मागण्याचा हेतू व उद्येश काय आहे हे अर्जात नमुद नाही तसेच माहितीचे स्वरुप मोठे आहे म्हणून पुरविता येणे शक्य नाही इत्यादी कारणे देवून माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात माहिती पुरविण्याबाबत निर्णय दिलेला आहे. मात्र सदरच्या निर्णयाने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अधिकारा खाली अर्ज देवून 1 जानेवारी 2009 ते 15 मे 2010 पर्यंत नविन विद्युत कनेक्शन करीता आलेल्या अर्जाबाबतची माहिती. त्यापैकी मंजूर केलेल्या अर्जाची माहिती तसेच अर्जातील त्रुटींची माहिती, डिमांड नोट दिल्याबाबतची माहिती इत्यादी बाबतची माहिती मागितलेली होती. मात्र त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली नसून त्यांनी दि. 7.7.2010 चे पत्राद्वारे असे उत्तर पाठविले की माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे ते कारण नमुद नाही तसेच माहिती अधिकारा खाली माहिती देणे बंधनकारक नाही त्याचप्रमाणे माहितीचे स्वरुप व्यापक प्रमाणात आहे म्हणून ते देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती फक्त दाखविण्याची संमती दर्शविली. तसेच माहिती मागण्याचा हेतू व उद्येश अर्जात नमुद केलेला नाही असा निष्कर्ष काढून प्रथम अपील निकाली काढले. अपीलकर्त्याने आजच्या सुनावणीत असेही नमुद केले की माहितीच्या अधिकाराप्रमाणे त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक आहे तरीही त्यांनी माहिती पुरविली नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये दंडाची कार्यवाही करण्यात यावी असे प्रतिपादन अपीलकर्त्याने सुनावणीत केले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 11.6.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला. त्या अर्जास अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास दि. 7.7.2010 च्या पत्राने उत्तर पाठविले आणि त्यात असे नमूद केले की माहिती कशासाठी हवी आहे किंवा उद्येश काय आहे हे अर्जात नमुद नाही तसेच माहिती व्यापक प्रमाणात असल्यामुळे माहिती देणे बंधनकारक नाही अशी कारणे देवून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यास नकार दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असेही नमूद केले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व्यापक प्रमाणात आहे त्याचप्रमाणे सदरची माहिती संकलित करण्यास जास्त कालावधी लागणार आहे तसेच ही माहिती तयार करण्यास बराच कालावधी लागणार होता म्हणून अपीलकर्त्यास त्यांनी माहिती दिलेली नाही असे त्यांनी नमूद केले.

5. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने सहाय्यक अभियंता श्री सुहास पडोळे हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दाखल झाले त्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 17.9.2010 रोजी घेण्यात आली. आणि त्यामध्ये असा निर्णय दिला की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही व्यापक व सखोल स्वरुपाची व जुनी आहे तसेच माहितीचा हेतू व उद्येश अर्जात नमूद केला नाही असा निर्णय प्रथम अपीलात दिलेला आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दि.

11.6.2010 च्या अर्जात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाचे मुदतीत त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या स्वरुपात अपीलकर्त्यास पुरविणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. उलट जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 7.7.2010 रोजी पत्राचे उत्तर पाठवून माहितीच्या अर्जात माहितीचे कारण नमुद केलेले नाही किंवा उद्येश नमुद केलेला नाही. तसेच माहिती व्यापक स्वरुपात आहे म्हणून माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहितीच्या अधिकारा खाली अर्जदाराने मागितलेल्या माहितीचे कोणतेही कारण देण्याची आवश्यकता नाही तसेच कोणत्या उद्येशासाठी माहिती मागितलेली आहे हे देखील सांगण्याची आवश्यकता नाही. केवळ कार्यालयामध्ये ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे माहितीच्या अधिकारा खाली बंधनकारक आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 7.7.2010 रोजीचे पत्र पाठविलेले आहे ते माहिती अधिकाराच्या तरतुदीशी अत्यंत विसंगत असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास माहिती 30 दिवसात उपलब्ध होण्यास सर्वस्वी जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात.

7. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या कडील दि. 11.10.2010 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयात माहितीचा हेतू व उद्येश अर्जात नमुद केलेला नाही असे कारण देवून अपील फेटाळलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांची ही कृती देखील बेकायदेशीर आहे. याचा अर्थ असा होतो की जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कोणत्याही तरतुदीचे पालन केलेले दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या कडील दि. 11.10.2010 च्या अर्जात नमुद केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाचे आंत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकारा खालील तरतुदीशी विसंगत अशा प्रकारची भूमिका घेवून अपीलकर्त्यास दि. 7.7.2010 च्या पत्राने माहिती देता येत नाही असे चुकीचे आणि बेकायदेशिर कळविले. याचा अर्थ असा की जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकाराच्या तरतुदीशी विसंगत कृती केल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. म्हणून त्या

विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या सक्षम अधिका–यांनी त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील प्रथम अपीलाचा निर्णय देतांना माहितीचा हेतू व उद्येश अर्जात नमुद केलेले नाही असे माहितीचा अधिकार अधिनियमाशी विसंगत कारण देवून अपील फेटाळलेले आहे ते देखील सर्वस्वी चुकीचे आणि बेकायदेशिर आहे म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा शर्ती नियमाप्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे **अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. गडचिरोली** यांचेकडे पाठविण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1180-1183

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1503 नाग/2010

श्री प्रल्हाद बाबुराव समर्थ
9, न्यु शिवाजी नगर(जुने काशीनगर क्र.2)
अभय नगर रोड(पश्चिम) रामेश्वरी रिंग रोड
नागपूर ता. जि. नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. गड्डीगोदाम,सदर, नागपूर
ता. जि. नागपूर
2) सौ. डी. डी. माडीलवार
जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.महाल विभाग,नागपूर
नाग पदीचे पुलाजवळ, सक्करदरा रोड, महाल नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.12.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडील दि. 28.4.2010 व दि. 17.5.2010 हया दोन अर्जाद्वारे माहिती अधिकारा खाली जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.महाल विभाग,नागपूर यांचेकडे न्यु शिवाजी नगर (जुने काशिनगर) येथे पथदीपाकरीता खंबे इत्यादीची माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.5.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 16.9.2010 रोजी दिलेला असून प्रथम अपील फेटाळलेले आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता हे उपस्थित होते. त्यांनी असे नमूद केले की त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.5.2010 च्या

पत्राद्वारे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी सदरची माहिती योग्य व समाधानकारक नाही असे त्यांनी नमूद केले. सुनावणीत अपीलकर्ता यांनी असेही नमूद केले की कोणतेही काम एकाच कालावधीत का पूर्ण केले जात नाही. याचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी असे दिलेले आहे की लाईन उभारणी करीता लागणारे सामान एकाच वेळी उपलब्ध राहात नाही त्यामुळे कामास वेळ लागतो. या उत्तराबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की लाईन उभारणी करीता एकाच वेळी का सामान उपलब्ध होत नाही आणि ते सामान एकाच वेळी उपलब्ध करुन देवून लाईन उभारणी त्वरीत करण्याचे आदेश आयोगाने महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला देण्याची आवश्यकता आहे. तसेच महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून होणा–या कामासाठी 10 वर्षाचा कालावधी लागतो. इतका मोठा कालावधी लागायला नको म्हणून आयोगाने महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस आदेश देण्याची आवश्यकता आहे. इत्यादी बाबी अपीलकर्त्याने आजच्या सुनावणीत आयोगापुढे सांगितल्या.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास दि. 21.5.2010 च्या पत्राने माहितीच्या अधिकारा खाली मागितलेली माहिती पुरविलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाली देखील आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमूद केले की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दि. 3.8.2010 रोजी दाखल झाले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी दि. 24.8.2010 रोजी घेण्यात आली. मात्र सदरच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. कारण अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहण्याची आवश्यकता नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांना दि. 23.8.2010 च्या पत्राने कळविलेले होते. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 16.9.2010 रोजी देवून त्यात असे नमूद केले आहे की जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.5.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील फेटाळलेले आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांच्या माहिती अधिकारा खालील अर्जाची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.5.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याची कबुली अपीलकर्त्याने सुनावणीत दिली. मात्र प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की आयोगाने महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस पथदीप लावण्यासाठी लाईन उभारणीसाठी एकाच वेळी सर्व सामान उपलब्ध करुन द्यावा अशा सुचना आयोगाने महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस देण्याचे करावे असे अपीलकर्त्याचे प्रामुख्याने म्हणणे दिसून येते. याबाबत नमुद करण्यात येते की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांचेकडे

असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे अधिकार आयोगास आहेत. मात्र पथदीप लावण्यासाठी किंवा लाईन टाकण्यासाठी सर्व सामान एकाच वेळी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने एका वर्षात उपलब्ध करुन द्यावा असे निर्देश महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस देण्याचे अधिकार आयोगास नाहीत. फक्त माहिती उपलब्ध करुन देण्याचे अधिकार आयोगास आहेत. ही बाब लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.5.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1185-1187

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1502 नाग/2010

श्री ज्ञानेश्वर आनंदराव नागदेवे
रा. प्लॉट नं. 72,न्यु कैलाश नगर, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. डी. रुडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री डी. व्ही. भालेराव
जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक(गृह)
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक(गृह) नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर यांचेकडे माहिती अधिकारा खाली अपीलकर्त्याच्या दि. 19.4.2010 च्या अर्जावर केलेल्या कार्यवाही संबंधात माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.10.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 24.5.2010 रोजी माहिती अधिकारा खाली अर्ज करुन त्यांच्या दि. 19.4.2010 रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात केलेली कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. मात्र त्यांना अद्याप माहिती मिळाली नाही.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की आयोगाकडे अपीलकर्त्याची तक्रार क्रमांक 201/2010 दाखल झाली होती. त्यामध्ये आयोगाने दि. 7.9.2010 रोजी निर्णय दिला. त्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांच्या दि. 19.4.2010 च्या अर्जात केलेली कार्यवाही अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचे कडून प्राप्त करुन घ्यावी असे आदेश दिलेले होते. मात्र अपीलकर्ता सदरची माहिती घेण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले नाही. म्हणून त्यांना माहिती देता आली नाही. तथापी अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती आयोगासमोर देण्याची तयारी दर्शविली आणि त्याला अनुसरुन आयोगासमोर अपीलकर्त्यास पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांचेकडे पाठविलेला दि. 19.4.2010 च्या अहवालाची प्रत आणि श्री विनोद दायमा, देविदास हजारे व दिलीप कसराम यांच्या बयानाच्या प्रती असे एकुण चार कागदपत्र अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरची कागदपत्र अपीलकर्त्याने आयोगासमोर स्वीकृत केली. म्हणून अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1189-1190

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1511 नाग/2010

श्री मुकुंद मंगरुजी लांजेवार
30,जुना सुभेदार लेआऊट विस्तार,
मानेवाडा रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. डब्ल्यु. राठोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती मौदा
ता. मौदा जि. नागपूर
2) श्री ए. एम. थापे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती कार्यालय मौदा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.12.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती मौदा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली रोजगार हमी योजनेखाली जवाहर विहिर कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थी निवडीबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती मौदा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत आयोगापुढे असे नमूद केले की त्यांनी माहिती अधिकारा खाली दि. 5.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती

मौदा यांचेकडे रोजगार हमी योजनेखाली जवाहर विहिर कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थी निवड करण्या संदर्भात माहिती मागितलेली होती. परंतू माहिती मध्ये प्रामुख्याने नाबार्डच्या व्याख्येप्रमाणे पावसाच्या पाण्यावरील शेतीवर अवलंबून असलेले/कोरडवाहू अल्पभूधारक व ओलीत अल्पभूधारक असावेत असा एक निकष आहे. त्या अनुषंगाने नाबार्डने कोरडवाहू अल्पभूधारक व ओलीत अल्पभूधारक याबाबत केलेली व्याख्या याबाबतची अपीलकर्त्यास माहिती पाहिजे होती. मात्र प्रस्तुत माहिती त्यांना मिळाली नाही तसेच अपीलकर्त्याने असेही नमूद केले की जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.8.2010 रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये त्यांना नाबार्डच्या व्याख्येबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. त्यामुळे अपीलार्थी यांचा या योजने अंतर्गत लाभ मिळण्याचा अर्ज हा अपात्र ठरविण्यात आलेला आहे. अपीलार्थीने सुनावणीत असेही नमूद केले की शासनाकडील शासन निर्णयामध्ये 0.40 क्षेत्रापेक्षा जास्त जमीन धारणा असल्यास लाभार्थी अपात्र ठरविल्या जातो. मात्र नाबार्डने यापेक्षा जास्त जमीन धारणेची मर्यादा निश्चित केलेली आहे म्हणून नाबार्ड कडील अल्पभूधारक शेतकरी ठरविण्याबाबतच्या निकषाची प्रत त्यांना आवश्यक आहे.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांच्या सोबत कृषी विभागाचे कृषी अधिकारी पंचायत समिती मौदा हे देखील उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की अपीलार्थी यांच्या दि. 5.7.2010 च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती अपीलार्थीस दि. 2.8.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच सुनावणीत त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की रोजगार हमी योजनेखाली जवाहर विहिर कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थीची निवड करण्यासाठी नियोजन विभागाकडील 14 आक्टोबर 1999 च्या शासन निर्णयात निकष देण्यात आलेले आहेत त्या निकषाखाली रोजगार हमी योजनेत जवाहर विहिर कार्यक्रम राबविण्यात येत असतो. या शासन निर्णयात प्रामुख्याने असेही नमूद केलेले आहे की ज्या अल्पभूधारक शेतक–याकडे कोणत्याही स्तोत्रापासून मिळणा–या पाण्याने एक एकरापेक्षा जास्त क्षेत्र ओलीत नाही अशा शेतक–यास हया योजनेचे लाभार्थी म्हणून पात्र समजावे. मात्र अपीलकर्ता याचे क्षेत्र हे एक एकरापेक्षा जास्त असल्यामुळे हया योजनेचा लाभ त्यांना देता आला नाही. तसेच नाबार्डने निर्धारीत केलेले अल्पभूधारका बाबतचे निकषा संदर्भात कोणतेही परीपत्रक जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही असे त्यांनी सुनावणीत नमूद केले.

5. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती मौदा हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांच्या कार्यालयास दि. 20.9.2010 रोजी प्राप्त झाले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 8.10.2010 रोजी घेण्यात आली. आणि दि. 18.10.2010 रोजी निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविल्यामुळे प्रथम अपील खारीज केलेले आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी रोजगार हमी योजनेखाली जवाहर विहिर कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थीची निवड करण्यात येते त्या संदर्भात नाबार्डकडील अल्पभूधारक शेतक–याच्या व्याख्येच्या संदर्भात माहिती मागीतली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांचेकडे नाबार्डचे अल्पभूधारक शेतक–याबाबतचे कोणतेही परीपत्रक उपलब्ध दिसून येत नाही. मात्र या योजनेखाली लाभार्थींची निवड नियोजन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील 14 आक्टोबर 1999 च्या निकषाप्रमाणे करण्यात येते. म्हणून प्रस्तूत प्रकरणी नाबार्डचे अल्पभूधारक निर्धारीत करण्याबाबत कोणतेही परीपत्रक किंवा कोणतीही व्याख्या पंचायत समिती मौदा कार्यालयाकडे उपलब्ध नाही. अशा प्रकारे स्पष्ट अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना रोजगार हमी योजनेखाली जवाहर विहिर कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थीची निवड करण्याबाबत नाबार्डचे कोणतेही परीपत्रक किंवा कोणतीही व्याख्या अल्पभूधारक निश्चित करण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1190-1192

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1512 नाग/2010

श्री विलास रामचंद्रराव लाडीकर
श्री लाडीकर राममंदीर, लाडीकर लेआऊट
मानेवाडा रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रा. शा. क–हाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त
हनुमान नगर झोन क्र. 3, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती निलीमा नेरकर
जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक
हनुमान नगर झोन क्र. 3, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी नस्तीवर हजर असल्याबाबत सही केली मात्र प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी उपस्थित राहिले नाहीत. तसेच उत्तरवादी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणीस हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक हनुमान नगर झोन क्र. 3, महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज देवून सहा. अधिक्षक हनुमान नगर झोन क्र. 3, महानगर पालिका नागपूर यांचेकडील पत्र क्र. 27 दि. 7.5.2010 नुसार यादीत दर्ज असलेली नावे व प्लॉट क्रमांकाप्रमाणे या प्लॉटवर ज्या कागदपत्रांच्या आधारे संबंधित प्लॉट धारकांनी आपली नावे दर्ज केली त्यांची कागदपत्रांची मागणी केलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत

माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सहा.आयुक्त हनुमान नगर झोन क्र. 3, महानगर पालिका नागपूर यांचेकडे दि. 25.7.2010 रोजी दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी त्यांचे कोणतेही म्हणणे मांडले नाही. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणीस हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती अधिकारा खाली दि. 8.7.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 27.7.2010 रोजी पोस्टाने प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावयाच्या माहितीच्या सुमारे 30 नस्तीची छाननी केली. त्या छाननीमध्ये बराचसा कालावधी गेला. त्याचे कारण असे की अपीलकर्त्याला द्यावयाची माहिती वेगवेगळया नस्तीमध्ये होती. या सर्व नस्ती संकलीत करुन अपीलकर्त्यास दि. 27.8.2010 च्या पत्राने नस्तीचे निरीक्षण करुन नस्ती पाहण्यास बोलविले होते आणि त्यामध्ये असे नमुद केले होते की नस्तीमधील नेमक्या कोणत्या पान क्रमांकाची प्रत हवी आहे त्याबाबत कळवावे म्हणजे माहिती पुरविता येईल असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले. त्याला अनुसरुन अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. 23.9.2010 रोजी उपस्थित झाले होते. मात्र त्यानंतर अपीलकर्ता दि. 1.11.2010 रोजी कार्यालयात आले असता त्यांना नस्तीचे निरीक्षण करण्यासाठी पुन्हा दि. 4.11.2010 रोजी बोलाविले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता दि. 4.11.2010 रोजी नस्तीचे निरीक्षण करण्यासाठी कार्यालयात उपस्थित झाले. त्यांनी आवश्यक त्या नस्तीचे निरीक्षण केले आणि त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्राची यादी तयार करुन दिली. अपीलकर्त्याने दिलेल्या यादीनुसार कागदपत्रे तयार करण्यात आली. त्याची फी रु. 174/- अपीलकर्त्याने दि. 15.11.2010 रोजी भरले. आणि त्यानंतर अपीलकर्त्याला दि. 16.11.2010 रोजी त्यांना हवी असलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिली. त्याबाबत कागदपत्रे मिळाल्याची पोच सुनावणीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली.

4. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन आणि त्यांनी सुनावणीत नमुद केलेल्या निवेदनावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी फी भरुन दि. 16.11.2010 रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. आणि त्याबाबत माहिती मिळाल्याची पोच सुनावणीत दाखल करण्यात आली. म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामेळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1192-1194

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1519 नाग/2010

श्री रवी श्याामलाल बाबरीया
प्लॉट नं. 12, गुरुनानकपूरा, शनिचरा मार्केट,
नागपूर ता. जि. नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. की. ललाट
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय, मुंबई 32.
2) श्री भा. ज. गाडेकर
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय, मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 28.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती अधिकारा खाली कु.एन.व्हि.न्यालेवार प्रशासकीय अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांचे संबंधीत एकुण 1 ते 6 मुद्यांची त्यांच्या वैयक्तीक स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली दि. 29.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे कु.एन.व्हि. न्यालेवार प्रशासकीय अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर

यांचे संबंधीत एकुण 1 ते 6 मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी माहिती अधिकारी यांनी दि. 21.8.2010 च्या पत्राने माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने देता येत नाही असे कळविले. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील अपील फेटाळल्यामुळे त्यांना माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमूद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय, मुंबई हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 20.8.2010 रोजी प्राप्त झाला. त्या अर्जातील मुद्या क्र. 2 व 3 अन्वये मागितलेल्या माहितीमध्ये वैयक्तिक माहितीचा समावेश असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 11 नुसार वैयक्तीक स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही कारण सदरची माहिती त्रयस्थ पक्षाची होती आणि त्रयस्थ पक्षाने सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिला होता. म्हणून मुद्या क्र. 2 व 3 ची माहिती देता येत नाही असे अपीलकर्त्यास दि. 21.8.2010 रोजी कळविण्यात आले. तथापी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती पैकी जी माहिती अर्जदारास उपलब्ध करुन द्यावयाची होती त्या माहितीसाठी रु. 6/– माहितीची फी आणि डाक खर्च रु. 25/– असे एकुण रु. 31/– भरणा करण्याबाबत दि. 21.8.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविलेले होते. मात्र अपीलकर्ता यांनी फी भरली नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी अपीलकर्ता यांनी पैसे भरल्यास आताही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने आयोगासमोर त्यांना पाहिजे असलेली माहिती म्हणजे महाराष्ट्र लोक सेवा आयोगाने प्रशासकीय अधिकारी पदासाठी प्रसिध्द केलेली जाहिरातीची प्रत अपीलकर्त्याने फी भरुन उपलब्ध करुन घेतली.

5. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय, मुंबई हे हजर होते. त्यानी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी दि. 30.9.2010 रोजी आणि दि. 20.10.2010 रोजी ठेवण्यात आली होती. मात्र अपीलकर्ता प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले नाहीत. तथापी त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दि. 20.11.2010 रोजी दिली. सदरच्या निर्णयात अपीलकर्त्याने माहितीची फी रु. 31/– भरणा केला नाही म्हणून अपील फेटाळण्यात आले असे त्यांनी सुनावणीत नमूद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असून ती वैयक्तीक स्वरुपाची आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 11 नुसार वैयक्तीक स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही तसेच ज्या त्रयस्थ पक्षाची माहिती मागितलेली आहे ती माहिती

पुरविण्यास त्रयस्थ पक्षाने नकार कळविलेला आहे. त्यामुळे ही माहिती अपीलकर्त्यास पुरविता येत नाही. तथापी अपीलकर्त्यास लोक सेवा आयोगाने प्रशासकीय अधिकारी पदासाठी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीच्या प्रतची मागणी केली ती प्रत फी भरुन जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत आयोगासमोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1195-1197

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1520 नाग/2010

श्री विश्वार आत्मारामजी क्षिरसागर
73 अ,ब, सन्मार्गनगर नं.2, वार्ड नं. 131,
हुडकेश्वर रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री बेंडे
जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.2
नागपूर
5 वा माळा, प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन,
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 28.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.2 यांचेकडे माहिती अधिकारा खाली मौजा बिडीपेठ नगर भूमापन क्र. 1442, 1441, 1440, 1439, 1438 अनुक्रमे ख.नं.11/3, 12/1, 11/1, 11/2 इत्यादींच्या आखीव पत्रिकेतील चुकीची नोंदी दुरुस्ती करण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 27.9.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.2 यांचेकडे दि. 23.8.2010 रोजी माहिती अधिकारा खाली मौजा बिडीपेठ नगर भूमापन क्र. 1438 ते 1442 मधील वर नमुद

केल्याप्रमाणे आखीव पत्रिकेतील चुकीच्या नोंदी दुरुस्त करण्याबाबतची माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.9.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 11.10.2010 रोजी प्राप्त झाली. सदरची माहिती उशिरा प्राप्त झाली असे अपीलकर्त्याने नमुद केले. तसेच अपीलकर्त्याने असेही सांगितले की यापूर्वी आयोगाकडे अपील क्र. 252/2009 हे दाखल झाले होते. त्यामध्ये दि. 20.8.2009 रोजी निर्णय देण्यात आला होता. त्या निर्णया प्रमाणे कार्यवाही झालेली नाही असेही अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.2 नागपूर हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्ता यांचा दि. 23.8.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 22.9. 2010 च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच सदरच्या पत्रात असेही नमुद करण्यात आले की मुद्या क्र. 2 बाबतची माहिती प्राप्त करण्यासाठी प्रती पेज रु. 2/— प्रमाणे माहितीची फी भरणा करावी. त्यानुसार अपीलकर्त्याने स्वतःच्या खर्चाने झेरॉक्स प्रती काढून सदरची माहिती दि. 11.10.2010 रोजी प्राप्त करुन घेतलेली आहे. तसेच अपीलकर्त्याच्या म्हणण्याप्रमाणे आयोगाकडील अपील क्र. 252/2009 मध्ये दि. 20.8.2009 रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी मा. अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांचेकडे दि. 9.6.2010 रोजी अहवाल पाठविलेला आहे. त्या अहवालावर मा. अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांचेकडून अद्याप कार्यवाही झालेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी नमुद केले. अपीलकर्त्याचे म्हणणे याबाबत असे आहे की आयोगाकडील अपील क्र. 252/2009 मध्ये दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे प्रथम अपील दि. 27.9.2010 रोजी दाखल झालेले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 7.12.2010 रोजी घेण्यात आली. आणि सदरच्या अपीलाचा निर्णय दि. 12.12.2010 रोजी देण्यात आला. सदरच्या निर्णया प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी सुनावणीत सांगितले. मात्र आयोगाकडील अपील क्र. 252/2009 मध्ये दिलेल्या निर्णया प्रमाणे अंमलबजावणी होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे दि. 9.6.2010 रोजी जो अहवाल पाठविलेला आहे त्या अहवालावर अधिक्षक भूमि अभिलेख यांनी काय कारवाई केली यांची माहिती अपीलकर्त्यास देणे योग्य होईल. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमूद केले की जन माहिती अधिकारी यांच्या दि. 9.6.2010 च्या अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी

यांनी अपीलकर्त्यास दि. 22.9.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच दि. 11.10.2010 रोजीसुध्दा अपीलकर्त्यास कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.6.2010 रोजी अधिक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयाकडे पाठविलेल्या अहवालावर काय कार्यवाही केली त्याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांनी दि. 9.6. 2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1198-1200

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1525 नाग/2010

श्री अजय गोपीचंद भाटीया
204, रचना अपार्टमेंट, न्यु रामदासपेठ, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुरेश देव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री पी. पी. धनकर
जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता(पश्चिम)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 29.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता(पश्चिम) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज करुन ख.क्र.181/3 मौजा चिंचभवन ओम श्री साई सेवाभावी गृहनिर्माण सहकारी संस्था हया अभिन्यासाची गुठेवारी होण्यास विलंबाचे कारणांची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील निकाली काढल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3.  आजच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की त्यांना माहितीच्या अधिकारा खाली दि. 30.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन ख.क्र. 181/3 मौजा चिंचभवन ओम श्री साई सेवाभावी गृहनिर्माण सहकारी संस्था हया अभिन्यासाची गुठेवारी होण्यास विलंबाचे कारणांची माहिती मागितलेली होती. मात्र अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांचेकडील दि. 28.9.2010 चे पत्राने पाठविलेली माहिती दि. 11.10.2010 रोजी मिळाली त्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. 1.10.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 15.10.2010 रोजी घेण्यात आली. मात्र प्रथम अपील निकाली काढले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे सुनावणीत सांगितले.

4.  आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.8.2010 चा अर्ज त्यांचेकडे दि. 31.8.2010 रोजी प्राप्त झाला. सदर अर्जात मागितलेल्या माहितीची छाननी करुन अपीलकर्त्यास दि. 28.9.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. सदरच्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की ख.क्र.181/3 मौजा चिंचभवन ओम श्री साई सेवाभावी गृहनिर्माण सहकारी संस्था हया अभिन्यासास दि. 12.11.2008 रोजी पोटभाग नकाशा संस्थेकडून किंवा अर्जदाराकडून उपलब्ध न झाल्यामुळे गुठेवारी कायद्यान्वये नामंजुर करण्यात आला होता. त्यानंतर एका भुखंडधारकाने पोटभाग नकाशा सादर केला आहे. त्यामुळे सदर अभिन्यास गुठेवारी कायद्यान्वये नियमितीकरणाची पुढील कार्यवाही सुरु आहे असे जन माहिती अधिकारी यांनी कळवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

5.  आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले आहे की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दि. 1.10.2010 रोजी दाखल झाले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 15.10.2010 रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्त्यास ख.क्र.181/3 बाबतच्या अनधिकृत अभिन्यास नियमित होण्यास लागलेल्या विलंबाचे कारण जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्याने प्रथम अपील दि. 15.10.2010 रोजी निकाली काढलेले आहे  असे त्यांनी नमुद केले.

6.  अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्त्याचे प्रकरण मौजा चिंचभवन ख.क्र.181/3 बाबतचे असून त्यांनी अनधिकृत अभिन्यास नियमित होण्यास लागणा—या विलंबाचे कारणे मागितलेली होती. त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1202-1204

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1528 नाग/2010

श्री मनोहर धकाते
अंचलेश्वर वार्ड चंद्रपूर
ता. जि. नागपूर चंद्रपूर 442402 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती जे. एस. साने
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक(सं)
अनुसूचित जमाती प्रमाणपत्रे तपासणी समिती औरंगाबाद
कश्मिरा भवन, सेवा योजन कार्यालयाजवळ, बस स्टॅन्ड रोड
औरंगाबाद
2) श्री एस. जी. राठोड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जमाती प्रमाणपत्रे तपासणी समिती औरंगाबाद
कश्मिरा भवन, सेवा योजन कार्यालयाजवळ, बस स्टॅन्ड रोड
औरंगाबाद ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हे सुनावणीस हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्रे तपासणी समिती औरंगाबाद यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली त्यांच्या समिती मार्फत तीन व्यक्तींना 1) शेख फारुख शेख इस्माईल 2) फिरदौस फातेमा उस्मान 3) तलत अंजुग स. अहमेदखॉ राजगोंड हया जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे ती वैधता प्रमाणपत्र ज्या कागदपत्रांच्या आधारावर देण्यात आलेली आहेत त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती मागितलेल्या दिसून येतात. तथापी अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी

प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील फेटाळले असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे एकुन घेता आले नाही. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्ता यांचा दि. 22.6.2010 चा माहितीच्या अधिकारा खालील माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 1.7.2010 रोजी प्राप्त झाला होता. सदर अर्जात अपीलकर्ता यांनी वरीत तीन व्यक्तींच्या राजगोंड हया जातीचे वैधता प्रमाणपत्र ज्या कागदपत्रांच्या आधारे दिलेली आहेत त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या समिती मार्फत राजगोंड हया जातीचे वैधता प्रमाणपत्र ज्या व्यक्तींना देण्यात आले होते त्या कागदपत्रांची पाहणी केली असता वरील तीनही व्यक्तींना राजगोंड जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. म्हणून अपीलकर्त्यास त्यांनी दि. 8.7.2010 च्या पत्राने वरील तीनही व्यक्तींना राजगोंड जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यात दिलेले नाही असे पंजीबध्द डाकेने कळविलेले आहे. दरम्यानच्या काळात माहितीच्या अधिकारा खाली इतर माहितीची छाननी केली असता असे दिसून आले की वरील तीनही व्यक्तींना 'राज' जातीचे वैधता प्रमाणपत्र समितीने दिलेले आहे. सदरचे वैधता प्रमाणपत्र समितीने सन 2001 मध्ये दिलेले आहे. मात्र अपीलकर्त्याने राजगोंड या जातीचे वैधता प्रमाणपत्र दिलेल्या कागदपत्राच्या प्रती मागितलेल्या आहेत. तथापी अपीलकर्त्यास 'राज' या जातीचे वैधता प्रमाणपत्र ज्या कागदपत्रांच्या आधारे दिले त्या कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास त्यांचेकडून नियमाप्रमाणे फी घेवून ती कागदपत्र उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिकारी यांनी संमती दिली.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक(संशोधन) अनुसूचित जमाती प्रमाणपत्रे तपासणी समिती औरंगाबाद हया उपस्थित होत्या. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांचेकडे अपीलकर्त्याचे प्रथम अपील पोस्टाद्वारे दि. 17.8.2010 रोजी प्राप्त झाले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 8.7.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती पुरविल्याचे स्पष्ट झाल्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीचे अपील दि. 8.7.2010 रोजी फेटाळलेले आहे. वास्तविक पाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दिला असता तर प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास माहिती अर्जात मागितलेल्या माहिती बाबत वस्तुस्थिती निदर्शनास आणून देता आली असती. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. म्हणून भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती केल्यास त्याची आयोगाकडून गंभीर दखल घेण्यात येईल त्याची समज प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

6. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी वरील तीनही व्यक्तींना राजगोंड

जातीचे वैधता प्रमाणपत्र ज्या कागदपत्रांच्या आधारे दिले त्याच्या प्रती मागितलेल्या होत्या. मात्र वरील तीनही व्यक्तींना राजगोंड जातीचे वैधता प्रमाणपत्र समितीने दिलेले नाही आणि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी दि. 8.7.2010 च्या पत्राने कळविल्याचे दिसून येते. मात्र वरील तीनही व्यक्तींना 'राज' जातीचे वैधता प्रमाणपत्र समितीने दिल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास 'राज' या जातीचे वैधता प्रमाणपत्र ज्या कागदपत्रांच्या आधारे दिलेले आहे त्या कागदपत्रांच्या प्रती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वरील तीनही व्यक्तींच्या 'राज' जातीचे वैधता प्रमाणपत्र ज्या कागदपत्रांच्या आधारे दिलेले आहे त्या कागदपत्रांच्या प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्याव्यात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1204-1206

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1527 नाग/2010

श्री मनोहर धकाते
अंचलेश्वर वार्ड चंद्रपूर
ता. जि. नागपूर चंद्रपूर 442402 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) i) श्री एम. जे. गणराज
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय,
वन भवन नागपूर
ii) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक
मानव संसाधन विकास, वन भवन नागपूर
2) i) श्री जी. टी. क—हाडे व श्री सी. एन. बडगुजर
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष 13, कक्ष 7(अ)
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वन भवन नागपूर
ii) श्री आर. व्ही. गोसावी
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी 5,
वनसंरक्षक, वन शिक्षण वृत्त पुणे
नवीन पी.एम.टी.इमारत, तिसरा मजला,
स्वारगेट पुणे 411042 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.12.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष 13, प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वन भवन नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज देवून वन विभागात सन 1995 मध्ये घेण्यात आलेल्या लेखापाल, लिपीक या संवर्गाचे परीक्षेच्या संदर्भात एकुण 1 ते 16 मुद्यांची माहिती

मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांचेकडील दि. 5.6.2010 च्या माहितीच्या अधिकारा खालील अर्जा प्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष 13 यांचेकडे वन विभागात सन 1995 मध्ये घेण्यात आलेल्या लेखापाल, लिपीक या संवर्गाचे परीक्षेच्या संदर्भात एकुण 1 ते 16 मुद्यांची माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही माहिती देखील प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे सुनावणीत नमुद केले. अपीलकर्ता यांनी सुनावणी दरम्यान असे नमुद केले की त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर त्यांना दि. 13.12.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून मुद्या क्र. 3,4,5 ची माहिती प्राप्त झाली. मात्र अद्यापही 16 मुद्यांपैकी 13 मुद्यांची माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही असेही त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्यांनी मागितलेल्या माहितीच्या बाबत त्यांनी आणखी असे नमुद केले की प्रस्तूत माहिती ही परीक्षेशी संबंधित असल्यामुळे परीक्षेची कोणतीही कागदपत्र ही कायम स्वरुपी रेकॉर्ड असते त्यामुळे सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र अशी वस्तुस्थिती असून देखील त्यांना 13 मुद्यांची माहिती मिळालेली नाही.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष 13, प्रधान मुख्य वनसंरक्षक हे हजर होते. त्यांनी असे नमूद केले की सदरचा माहितीचा अर्ज हा कक्ष अधिकारी कक्ष 7 यांचेकडे दि. 15.7.2010 रोजी प्राप्त झाला. सदरच्या अर्जातील माहिती वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दि. 16. 7.2010 च्या पत्राने सदरचा अर्ज माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी 5 वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे हस्तांतर केला आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना पाठवून संबंधित कार्यालयाशी पाठपुरावा करण्याबाबत कळविले.

5. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी 5 वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे श्री गोसावी हे हजर होते. त्यांनी असे नमूद केले की त्यांचेकडे सदरचा अर्ज दि. 19.7.2010 रोजी प्राप्त झाला. मात्र सदरच्या अर्जातील माहिती प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांचेशी संबंधित असावी म्हणून त्यांनी पुन्हा सदरचा अर्ज प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांचे कार्यालयाकडे माहिती देण्यासाठी पाठविला. तथापी सदरची माहिती प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांचे कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे

पुन्हा कक्ष अधिकारी 7 प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर कार्यालय यांनी दि. 30.8.2010 च्या पत्राने सदरचा अर्ज पुन्हा जन माहिती अधिकारी वनसंरक्षक वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडे पाठविला तो अर्ज दि. 31.8.2010 रोजी प्राप्त झाला. सदरचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अर्जातील माहितीचा शोध घेतला असता अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. 3,4,5 ची माहिती त्यांच्या कार्यालया उपलब्ध झाला म्हणून त्यांनी सदरची माहिती दि. 13.12.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास पाठविल्याचे सुनावणीत नमुद केले. सदरच्या तीन मुद्यांची माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्ता यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र एकुण 1 ते 16 मुद्यांपैकी 3 मुद्दे सोडून 13 मुद्यांची माहिती अद्यापही त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्त्याने नमुद केले. बाकी मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास का उपलब्ध करुन देण्यात आली नाही याबद्यल जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी 5 वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांनी कोणताही समाधानकारक खुलासा सादर केलेला नाही. वास्तविक पाहता अपीलकर्त्याचा माहितीच्या अर्जात एकुण 1 ते 16 मुद्यांची माहिती त्यांनी मागितलेली असतांना माहिती अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते किंवा माहिती बाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक होते मात्र तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तसेच अपीलकर्त्यास 3 मुद्यांची उपलब्ध करुन दिलेली माहिती देखील 30 दिवसाचे आंत उपलब्ध करुन दिलेली नाही सदरची 3 मुद्यांची माहिती देखील सुमारे 140 दिवसा नंतर उपलब्ध करुन दिलेली आहे आणि बाकी 13 मुद्यांची माहिती देखील उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच जन माहिती अधिकारी वनसंरक्षक वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांच्याकडे माहिती असूनही सदरच्या माहितीचा अर्ज कारण नसतांना पुन्हा त्यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांच्या कार्यालयाकडे पाठविला पुन्हा प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांनी त्यांच्याशी माहिती संबंधीत नसल्यामुळे दि. 30.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी वनसंरक्षक वन शिक्षण वृत्त यांचे कार्यालयाकडे पाठविला. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 13.12.2010 च्या पत्राने केवळ 3 मुद्यांचीच माहिती पाठविली आणि बाकी 13 मुद्यांची कोणतीही माहिती पाठविली नाही. म्हणून माहिती देण्यास विलंब झालेला दिसून येतो. कारण माहिती अधिका–याकडे माहितीचा अर्ज दि. 19.7.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्यातील फक्त 3 मुद्यांची माहिती दि. 13.12.2010 रोजी देण्यात आलेली आहे. म्हणजे सदरची माहिती देण्यास सुमारे 140 दिवस उशिर झालेला दिसून येतो आणि बाकी 13 मुद्यांची माहिती अद्यापही दिलेली नाही. या बाबीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी 5 वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे हे जबाबदार दिसून येतात. 13 मुद्यांची माहिती देण्यास का विलंब झाला याचा कोणताही खुलासा ते समाधानकारक करु शकले नाही म्हणून माहितीच्या अधिकाराखालील अर्जाची योग्य ती दखल त्यांनी घेतली नाही म्हणून त्या विलंबास माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात.

6. अपीलकर्त्याने प्रथम अपील प्रशासकीय अधिकारी प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांच्या कार्यालयाकडे दि. 30.8.2010 रोजी दाखल केलेले आहे. सदरचे अपील त्यांचेकडे दि. 31.8.2010 रोजी प्राप्त झाले असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र प्रस्तूत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक मानव संसाधन विकास, नागपूर हे असल्यामुळे प्रशासकीय अधिकारी यांनी दि. 1.9.2010 रोजी अर्ज हस्तांतर केला असे सुनावणीत सांगितले. वनसंरक्षक मानव संसाधन विकास, नागपूर यांच्या वतीने श्री ए. के. पथे हे सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी असे नमूद केले की प्रस्तूतचे अपील त्यांचे कार्यालयात प्राप्त झाले होते. मात्र सदरचे प्रथम अपीलावर सनावणी घेण्यात आली नाही किंवा निर्णय देखील दिलेला नाही. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर 30 दिवसाचे मुदतीत किंवा कारणमिमांसा देवून 45 दिवसाचे मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय बंधनकारक आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. म्हणून प्रस्तूत प्रकरणात वनसंरक्षक मानव संसाधन विकास, नागपूर यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार कायद्याने जबाबदारी पार पाडलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा शर्ती नुसार शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक आहे.

7. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता तसेच संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अधिकारा खालील अर्जाप्रमाणे एकुण 1 ते 16 मुद्यांपैकी 3 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ती देखील वर नमुद केल्या प्रमाणे सुमारे 140 दिवसाच्या विलंबाने दिलेली आहे. मात्र 13 मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी 5 वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांनी अद्यापही उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी 5 वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांनी अपीलकर्ता यांना एकुण 1 ते 16 मुद्यांपैकी अद्याप माहिती उपलब्ध करुन द्यावयाचे राहिलेल्या 13 मुद्यांची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.
2) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी 5 वन शिक्षण वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास वर नमुद केल्याप्रमाणे विलंब केलेला आहे. सदरच्या विलंबास ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1)

प्रमाणे रु. 20000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक मानव संसाधन विकास, नागपूर यांचेकडे अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्या अपीलाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही तसेच माहितीच्या अधिकारान्वये कलम 19 (6) मधील तरतूदी नुसार तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत कारणे लेखी नमुद करुन निकालात काढलेले नाही हे स्पष्ट होते. म्हणून त्यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा शर्ती नुसार शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. म्हणून त्या निर्णयाची एक प्रत **प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1207-1211

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1531 नाग/2010

श्री मनोहर धकाते
अंचलेश्वर वार्ड चंद्रपूर
ता. जि. नागपूर चंद्रपूर 442402 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती वसुधा नाईक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक(सं)
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) i) श्री अशोक वहाणे
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली
ii) श्री गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गिरीपेठ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज करुन श्री बाबा एकनाथ महेशकर यांना दि. 11.10.1999 ला जाती वैधता प्रमाणपत्र ज्या कागदपत्रांच्या आधारे देण्यात आलेली आहे त्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी मागितलेल्या दिसून येतात. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी असे सांगितले की वर नमुद केल्या प्रमाणे श्री बाबा एकनाथ महेशकर यांना जाती वैधता प्रमाणपत्र ज्या कागदपत्रांच्या आधारे दिले त्या कागदपत्रांच्या प्रती माहितीच्या अधिकारा खाली जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितल्या होत्या. तथापी जन माहिती अधिकारी नागपूर यांनी श्री महेशकर यांच्या वैधता प्रमाणपत्राची नस्ती गडचिरोली कार्यालयास पाठवून माहिती अधिकारी गडचिरोली यांचेकडे माहिती मागण्याचे सुचित केले. तथापी त्यांचेकडून त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक गडचिरोली यांचेकडे दि. 30.8.2010 ला प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आज पर्यंत अपील निकाली काढले नाही तसेच त्यांना माहिती देखील उपलब्ध झालेली नाही. म्हणून माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याने श्री बाबा एकनाथ महेशकर यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची माहिती मागितलेली होती. सदरच्या नस्तीचा त्यांच्या कार्यालयात शोध घेण्यात आला. परंतू नागपूर कार्यालयाकडून सदरची नस्ती गडचिरोली यांच्या कार्यालयाकडे हस्तांतर केला असल्याचे रेकॉर्डचा शोध घेतल्या नंतर दिसून आले. म्हणून जन माहिती अधिकारी नागपूर यांनी अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज माहिती अधिकारी गडचिरोली यांच्या कार्यालयाकडे पाठविला.

5. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी गडचिरोली यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज नागपूर कार्यालयाकडून दि. 14.7.2010 रोजी प्राप्त झाला. त्यानंतर अपीलकर्ता यांना हवी असलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. नागपूर कार्यालयाकडून गडचिरोली कार्यालयाकडे सुमारे 50 हजार नस्त्या हस्तांतर झालेला आहेत. त्या नस्त्या मध्ये श्री बाबा एकनाथ महेशकर यांचे नस्तीचा शोध घेताला असता उक्त नस्ती अद्याप दिसून आलेले नाही. म्हणून सद्यस्थितीत माहिती पुरविता येत नाही असे माहिती अधिकारी गडचिरोली यांनी अपीलकर्ता यांना दि. 21.7.2010 च्या पत्राने कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी गडचिरोली यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी हा सन 1999 चा आहे. सदर कालावधीत नागपूर समिती कडून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे कार्य केले जाते. नागपूर समितीच्या माध्यमातून सुमारे 50 हजार नस्त्या गडचिरोली समितीकडे वर्ग केलेले आहेत. सदर नस्त्या वर्षवार लावण्याचे काम सुरु आहे म्हणून श्री महेशकर यांची नस्ती रेकॉर्डमध्ये उपलब्ध झाल्या नंतर अपीलकर्त्यास नियमाप्रमाणे माहिती देण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे माहिती अधिकारी गडचिरोली यांनी सांगितले.

6. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक(सं) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली श्रीमती वसुधा नाईक हजर होत्या. त्यांनी

असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झालेले होते. मात्र त्यांचेकडे नागपूर आणि गडचिरोली हया दोन्ही समितीचा अतिरिक्त पदभार त्यांचेकडे देण्यात आलेला आहे तसेच नागपूर आणि गडचिरोली कार्यालयाचे आहरण व संवितरण अधिकारी पदाचाही कार्यभार त्यांचेकडे आहे. त्याचप्रमाणे नागपूर आणि गडचिरोली या जिल्हयाचे आदिवासी विकास विभागाच्या जिल्हा महिला सल्लागार समितीचे सदस्य सचिवाचे कामही त्यांचेकडे आहे. म्हणजे श्रीमती नाईक यांचेकडे नागपूर व गडचिरोली जिल्हयाचे उपसंचालक पद तसेच दोन्ही जिल्हयाच्या समितीचे सदस्य सचिव पद तसेच दोन्ही जिल्हयाच्या कार्यालयाचे आहरण व वितरण अधिकारी आणि दोन्ही जिल्हयाचे जिल्हा आदिवासी महिला सल्लागार समतीचे सदस्य सचिव पद इतक्या पदांचा कार्यभार त्यांचेकडे असल्यामुळे यातील काही पदांचा कार्यभार काढण्यासाठी त्यांनी शासनास पत्रव्यवहार केलेला आहे. वरील प्रमाणे अतिरिक्त पदांचा जादा पदभार त्यांचंकडे असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय कार्यबाहुल्यामुळे त्यांना घेता आलेला नाही. तसेच नागपूर कार्यालयाकडून गडचिरोली कार्यालयाकडे सुमारे 50 हजार नस्त्या वर्ग झाल्यामुळे त्या नस्त्या वर्षवार लावण्याचे काम सुरु आहे त्यामुळे देखील प्रथम अपीलाचा निर्णय घेता आला नाही असेही त्यांनी सुनावणीत नमुद केले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारा खाली मागितलेली माहिती ही सन 1999 ची आहे त्यावेळी वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही नागपूर समिती कडून केली जात होती. त्यानंतर गडचिरोली समिती स्वतंत्र अस्तित्वात आली म्हणून नागपूर कार्यालयाकडून सुमारे 50 हजार नस्त्या गडचिरोली समितीकडे वर्ग झालेल्या असून त्या वर्षवार लावण्याचे काम सुरु आहे. म्हणून अपीलकर्त्याने श्री महेशकर यांच्या बाबत मागितलेल्या माहितीचा शोध माहिती अधिकारी घेंत असल्याचे दिसते. म्हणून माहिती अधिकारी यांनी सदर नस्तीचा 30 दिवसाचे आत शोध घेवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे नागपूर आणि गडचिरोली या दोन जिल्हयाच्या सुमारे सहा पदांचा पदभार त्यांचेकडे असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय घेवू शकले नाहीत अशी वस्तुस्थिती त्यांनी विशद केली. मात्र भविष्यात अतिरिक्त पदाचा पदभार जरी असला तरी त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय घेणे आवश्यक आहे याची ताकीद त्यांना देण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी श्री महेशकर यांच्या नस्तीचा कसून शोध घ्यावा आणि अपीलकर्त्यास माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

2) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी भविष्यात प्रथम अपीलाचा निर्णय नियमाप्रमाणे मुदतीत घेण्याची सक्त ताकीद त्यांना देण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1213-1216

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**